# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Naresh M. Madavi
Director (I/c.)
Ph. No. - 07132-223320

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 263 /2018

Dt: 04/01/2018

प्रति,

मा. जिल्हा समन्वयक, व विभागीय समन्वयक, रासेयो
गडचिरोली व चंद्रपुर जिल्हा,
सलग्नीत गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय :– राज्यस्तरीय चर्चा सत्रात सहभागी होण्याबाबत.

संदर्भ :– दि. ३०/०१/२०१७ रोजी राज्य संपर्क अधिकारी रासेयो, महाराष्ट्र शासन यांचे ईमेल.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये आपणास दि. १८ जानेवारी २०१6 रोजी सकाळी १०:०० वाजता ''उन्नत भारत अभियान/उन्नत महाराष्ट्र अभियान'' अंतर्गत '' नॉलेज कॉलेज – व्हिलेज सहयोगी '' प्रकल्प या विषयावर महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. धंनजय गाडगीळ साश्वत ग्राम विकास केंद्र, गोखले अर्थशास्त्र संख्या पुणे, शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय पुणे, यांचे संयुक्त विद्यमाने आयोजीत केलेली आहे. करीता आपन सदर राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभागी व्हावे हि विनंती.

डॉ. नरेश मडावी
संचालक (प्र)
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यपीठ,गडचिरोली

प्रति,

मा. डॉ.अतुल साळुंखे

राज्य जनसंपर्क अधिकारी (OSD)

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय:- राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजना बाबत...**

**संदर्भ:-दिनांक २१ डिसेंबर २०१७ चे संदर्भ क्र.१७.१५/१०८८/२०१७ हे केंद्राचे पत्र**

महोदय,

डॉ. धनंजयराव गाडगीळ शाश्वत ग्राम विकास केंद्र, हे गोखले अर्थशास्त्र संस्थेत कार्यरत केंद्र असून शिक्षण आणि विकास यांच्या समन्वयातून शाश्वत ग्रामीण विकास या उद्दिष्टासाठी गेली दोन वर्ष कार्यरत आहे. उच्च शिक्षणाचा ग्रामीण विकासातील महत्वाचा कार्यभाग लक्षात घेवून **"नॉलेज-कॉलेज-व्हिलेज सहयोगी प्रकल्प"** आखण्यात आला असून विद्यापीठ, महाविद्यालये आणि प्रत्यक्ष ग्राम पातळीवरील ग्राम प्रशासन आणि गावातील युवक यांचे सहयोगातून शाश्वत ग्राम विकास असे या प्रकल्पाचे स्वरूप आहे.

**"उन्नत भारत अभियान"** हा राष्ट्रीय पातळीवरील उच्च शिक्षणाला ग्राम विकासाशी जोडणारा एक महात्वाकांशी प्रकल्प होय.डॉ.विजय भटकर हे यासंदार्भातील राष्ट्रीय सुकाणू समितीचे अध्यक्ष असून त्यांच्याच मार्गदर्शनाखाली एक राज्य स्तरीय चर्चासत्र घेण्याचे आयोजन आपल्याशी चर्चा करून निश्चित झाले आहे.

सदर चर्चासत्र हे आपल्या सोयीच्या व आदरणीय विजय भटकर आणि प्रा.डॉ.राम ताकवले यांनी मान्य केलेल्या दिवशी म्हणजे गुरुवार दिनांक १८ जानेवारी २०१८ रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे स्थळ गोखले अर्थशास्त्र संस्था, (अभिमत विद्यापीठ ) डेक्कन जिमखाना पुणे हे निश्चित झाले आहे.

आपण चर्चा केल्याप्रमाणे या कार्यशाळेचा विषय **"नॉलेज-कॉलेज-व्हिलेज सहयोगी प्रकल्प"** आराखडा दिशादर्शन असा आहे.उन्नत भारत अभियान या राष्ट्रीय कार्यक्रमाचा राज्यापातळीवरील अंमलबजावणी कृती कार्यक्रम निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन असून महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाशी निगडीत प्रत्येक विद्यापीठातून किमान पाच महाविद्यालये व त्यातून १० विद्यार्थी व विभागीय समन्वयक सहभागी झाल्यास राज्य पातळीवर यासंदर्भात शासनाचे बरोबरीने एक पथदर्शी कार्यक्रम हाती घेण्यात येईल. विद्यापीठ व महाविद्यालय पातळीवर राष्ट्रीय सेवा योजना हा ग्रामीण भागाशी जोडणारा महत्वाचा दुवा असल्याने पहिल्या पातळीवर एन.एस.एस. विभाग व पुढे सर्वच शैक्षणिक विभागाचे संशोधन व विस्तार सेवा या प्रकल्पाशी जोडून ग्राम शाश्वत विकास प्रक्रिया अधिक परिणामकारक करता येणे शक्य आहे.तरी याबाबत आपल्या कार्यालयीन राज्य पातळीवरून महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठाना विद्यार्थी व निवडक कार्यक्रमाधिकारी सहभागाबाबत चे आदेश निर्गमित व्हावेत ही नम्र विनंती.

कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्याने व सहभागी व्यक्तीने  कार्याशाळेच्या ठिकाणी गुरुवार दिनांक १८ जानेवारी रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत उपस्थित राहणे आवश्यक आहे. कार्यशाळा सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० पर्यंत असून संपूर्ण वेळ सहभागी विद्यार्थी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

---

**कार्यशाळा विषय :-*उन्नत भारत अभियान /उन्नत महाराष्ट्र अभियान अंतर्गत "नॉलेज-कॉलेज-व्हिलेज सहयोगी" प्रकल्प.(राज्यस्तरीय युवा चर्चासत्र).***

**आयोजक:- *महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. धनंजयराव गाडगीळ शाश्वत ग्राम विकास केंद्र, गोखले अर्थशास्त्र संस्था ,पुणे,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, यांचे संयुक्त विद्यमाने.***

**वार व दिनांक :-*गुरुवार दिनांक १८ जानेवारी २०१८.***

**वेळ:- *सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३०.***

**स्थळ:-*काळे हॉल, गोखले अर्थशास्त्र संस्था( अभिमत विद्यापीठ )डेक्कन जिमखाना पुणे- ४११००४.***

**सहभाग:-*महाराष्ट्रातील १० अकृषी विद्यापीठांतर्गत सलग्न ५० महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील १०० स्वयंसेवक.व जिल्हा वा विभागीय कार्यक्रम अधिकारी.***

आपला विश्वासू

प्रा.डॉ. कैलास बवले

समन्वयक

डॉ. धनंजयराव गाडगीळ शाश्वत ग्राम विकास केंद्र, पुणे